


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**

स्वत:ला कधीही कमी लेखू नका;
तुमच्या आत्मविश्वासाने
अशक्य गोष्टी सुद्धा
शक्य होऊ शकतात.

वर्ष : ०५ | अंक : ९४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.१७ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# धावत्या बसला अचानक आग ! 'त्या' एका निर्णयामुळे ५० प्रवाशांचे प्राण वाचले

## राज्यात बस, चारचाकी वाहनांच्या दुर्घटनेचे सत्र सुरूच...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, नागपूर :** नागपूर-उमरेड महामार्गावर आज रविवारी दुपारी मोठी दुर्घटना टळली. एका खासगी ट्रॅव्हल्सच्या बसला अचानक भीषण आग लागल्याने काही क्षणासाठी घटनास्थळी भीती पसरली होती. मात्र, चालकाच्या तात्काळ निर्णयक्षमतेमुळे बसमध्ये प्रवास करणाऱ्या सुमारे ४० ते ५० प्रवाशांचे प्राण बचावले. ही घटना आज रविवारी दुपारच्या सुमारास चक्री घाटाजवळ घडली.



मिळालेल्या माहितीनुसार, बस उमरेड येथून नागपूरकडे येत होती. प्रवास सुरळीत सुरू असतानाच बस चालकाचं लक्ष इंजिनमधून निघणाऱ्या धुराकडे गेलं. काहीतरी बिघाड झाल्याची शंका येताच चालकाने लगेच बस रस्त्याच्या कडेला थांबवली. त्यानंतर त्याने प्रवाशांना तात्काळ बसमधून खाली उतरण्यास सांगितलं. त्याच्या यावेळी घेतलेल्या योग्य निर्णयामुळे मोठा अनर्थ टळला. प्रवाशांनी बाहेर पडताच काही मिनिटांत अगदी पाहताक्षणी आगीचे लोटांनी संपूर्ण बसला आपल्या कवेत घेतलं. काहीजणांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केला. प्रवाशांच्या डोळ्यांसमोर बस क्षणार्धात ज्वाळांनी वेढली गेली. अखेर काही वेळातच संपूर्ण बस राख झाली. घटनेची माहिती मिळताच उमरेड पोलीस आणि अग्निशमन दलाची टीम तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग नियंत्रणात आणली. मात्र, आग एवढी भीषण होती की बसचे फक्त सांगाडे शिल्लक राहिले. प्रवासी सुरक्षित असल्याची खात्री होताच स्थानिक ग्रामस्थांनीही सुटकेचा निश्वास सोडला. प्राथमिक तपासानुसार बसमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यानं ही आग लागली असावी, असा अंदाज आहे. तांत्रिक तपास सुरू असून बसमधील विद्युत यंत्रणेमध्ये बिघाड का झाला? याचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान, या घटनेमुळे नागपूर-उमरेड मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. जळालेल्या बसमुळे रस्ता अडकल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. पोलिसांनी वाहतूक सुरळीत करण्यासाठी तत्परता दाखवत रस्त्यावरील कोंडी दूर केली आणि वाहतूक पुन्हा पूर्ववत केली. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसून, चालकाच्या सतर्कतेचे सर्व स्तरांतून कौतुक केलं जात आहे. नागपूर जिल्ह्यात मागील काही दिवसांत वाहनांमधील शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याच्या घटना वाढत असल्यानं, अशा वाहनांची तांत्रिक तपासणी काटेकोरपणे होण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# वडापुरात वृद्ध पती-पत्नीचा एकाच दिवशी मृत्यू

## शोकाकुल वातावरणात एकाच चितेवर दिला अग्नी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर येथे वयोवृद्ध पती-पत्नीचा अल्पशा आजाराने शुक्रवारी एकाच दिवशी मृत्यू झाला. दोघांनाही एकाच चितेवर अग्नी देण्यात आला. मन हेलावून टाकणारी ही घटना पाहून ग्रामस्थांना शोक अनावर झाला.



वडापूर येथील किसन रामा हेगडे (वय ७०) यांचे शुक्रवारी दुपारी तीन वाजता आजाराने निधन झाले. रात्रीच त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार होते. मात्र त्यांचा बाहेरगावी असलेला भाऊ येण्याची सर्वजण वाट पाहत होते. त्याचवेळी दुसरीकडे अंत्यसंस्काराची तयारीही सुरू होती. भाऊ येण्यास उशीर झाला. दरम्यान रात्री पावणे नऊ वाजता मयत किसन यांची आजारी असलेली पत्नी भामाबाई हेगडे (वय ६०) यांचेही निधन झाले. एकाच वेळी पती-पत्नीचा मृत्यू झाल्याचे बातमी संपूर्ण गावात पसरली. यामुळे सारा गाव हळहळू लागला. त्यानंतर गावातील ज्येष्ठ सेवानिवृत्त शिक्षक अरुण पाटील यांच्यासह ग्रामस्थ व हेगडे परिवाराने दोघांच्या पार्थिवावर सकाळी अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला. आज शनिवारी सकाळी ९ वाजता या दोन्ही वृद्ध दाम्पत्याच्या अंत्यसंस्कारासाठी सर्व धर्मीय ग्रामस्थ नव्हे तर सारा गाव गोळा झाला. यावेळी दोघांच्या मृतदेहाला एकाच चितेवर अग्नी देण्यात आला. दोघांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

# घरच्या मैदानावर भारताने हातातला सामना गमावला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, कोलकाता :** दक्षिण आफ्रिकेने भारताविरुद्धचा पहिला कसोटी सामना अवघ्या तीन दिवसांत जिंकला. कोलकाता येथे खेळल्या गेलेल्या कसोटी सामन्यात त्यांनी भारतीय संघाचा सर्वांगीण पराभव केला. या दणदणीत विजयासह, दक्षिण आफ्रिकेने दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत केवळ १-० अशी आघाडी घेतली नाही तर ईडन गार्डन्सवर ५३ वर्षांचा जुना विक्रमही मोडला. ईडन गार्डन्सवर बचावलेल्या सर्वात कमी धावसंख्येचा हा विक्रम दक्षिण आफ्रिकेने मोडला.



दक्षिण आफ्रिकेने भारतासमोर विजयासाठी १२४ धावांचे लक्ष्य ठेवले. ईडन गार्डन्सवर त्याचा पाठलाग करणे हा एक मोठं काम होते. जर भारतीय संघ यशस्वी झाला असता तर त्यांनी २१ वर्षांपूर्वीचा स्वतःचा विक्रम मोडला असता. पण तसे झाले नाही. उलट, दक्षिण आफ्रिकेने १२४ धावांचा बचाव करून ५३ वर्षे जुना विक्रम मोडला. १२४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, भारतीय संघ दुसऱ्या डावात १०० धावाही करू शकला नाही. कर्णधार शुभमन गिलच्या पराभवाने आधीच मोठा धक्का बसला होता. दुसऱ्या डावात उर्वरित नऊ विकेट फक्त ९३ धावांत बाद झाल्या. परिणामी, दक्षिण आफ्रिकेने ३० धावांनी सामना जिंकला आणि १५ वर्षांत भारतात त्यांचा पहिला कसोटी विजय मिळवला. अशाप्रकारे, आफ्रिकन संघाने सामना ३० धावांनी जिंकला आणि कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. कोलकाता येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिल्या डावात दक्षिण आफ्रिकेचा संघ १५९ धावांवर बाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून एडेन मार्करामने सर्वाधिक ३१ धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने डावाची सुरुवात केली. मोहम्मद सिराज आणि कुलदीप यादवने प्रत्येकी दोन विकेट घेतल्या. अक्षर पटेलनेही एक विकेट घेतली.

या सामन्यात भारताला सर्वात मोठं नुकसान झाले ते शुभमन गिलच्या रुपाने. शुभमन गिल पहिल्या कसोटीतून बाहेर पडला आहे. कोलकाता येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी कर्णधार शुभमन गिलच्या मानेला दुखापत झाली. दिवसाचा खेळ संपल्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आले.

# वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले दिवगंत वसंतराव नाईक यांनी राज्याच्या दुष्काळ मुक्तीसाठी केलेली जलसंधारणाची कामे तसेच अन्नधान्यांमध्ये स्वयंपूर्णतेसाठी राबविलेल्या उपक्रमांचा आजही राज्याला मोठा लाभ होत आहे. राज्याला दिशा देणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने दिशादर्शक असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

छत्रपती संभाजीनगर शहरातील सिडको येथे हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री दिवगंत वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आज झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, इतर मागास बहुजन कल्याण, दुगधविकास, अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, खासदार डॉ. भागवत कराड, आमदार संजय केणेकर, आमदार अनुराधा चव्हाण, मनपा आयुक्त जी. श्रीकांत उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, हरित क्रांतीचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा राज्याच्या जडणघडणीमध्ये मोलाचा वाटा आहे. राजकारणात विविध पदावर काम करताना महाराष्ट्र स्वयंपूर्ण करण्याचे देखील काम केले. बंजारा समाजामध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण केली. समाजाला शिक्षणाकडे वळविण्यासाठी अनेक शिक्षण संस्थांची निर्मिती केली असून समाजातल्या विविध परंपरा जोपासल्या पाहिजेत यासाठीही त्यांनी प्रयत्न केला, राजकीय सामाजिक जीवनामध्ये नगराध्यक्ष पदापासून आमदार, खासदार मुख्यमंत्री अशा विविध पदांवर नाईक साहेबांनी काम केले. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सर्वाधिक काळ राहिलेले मुख्यमंत्री म्हणून दिवंगत नाईक साहेबांच्या नावाची




नोंद असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील १९७२ च्या भीषण दुष्काळात राज्याला जलसंधारणातून दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय दिवगंत वसंतराव नाईक यांनी घेतला. महाराष्ट्र दुष्काळमुक्त करायचा असेल तर जलसंधारण हाच एकमेव मार्ग आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब साठवा, जमिनीतील पाणी वाढवा, वाहून जाणारी माती रोखा तरच शेतकरी बांधवांना दिलासा मिळेल, असा विचार त्यांनी रूजविला. दिवंगत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात व्यापक स्वरूपात जलसंधारणाची कामे सुरू करून जलक्रांतीची पायाभरणी केली. महाराष्ट्र अन्नधान्यांच्या बाबतीत समृद्ध व स्वयंपूर्ण व्हावा, हा त्यांचा स्पष्ट हेतू होता. महाराष्ट्राला स्वयंपूर्ण करून मोठे परिवर्तन घडवून आणले आणि ते पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरले. दुष्काळाचा सामना करताना इतिहासाचा मागोवा घेतल्यावर हे प्रकर्षाने जाणवले की, दुष्काळाशी लढण्याचा खरा मार्ग म्हणजे नाईक साहेबांनी दाखविलेला जलसंधारणाचा मार्ग. त्याच प्रेरणेने पुढे जलयुक्त शिवार ही राज्यव्यापी योजना तयार करण्यात आली. या योजनेद्वारे महाराष्ट्रभर जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे झाली. योजना तयार करत असताना अनेक व्यक्ती प्रेरणास्थान म्हणून आमच्यासमोर होत्या; परंतु या संपूर्ण उपक्रमामागील मूळ प्रेरणास्थान म्हणजे वसंतराव नाईक साहेबच, हे आपण त्या काळातही स्पष्टपणे नमूद केल्याचा उल्लेखही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

दिवगंत वसंतराव नाईक साहेबांनी राज्यात कृषी व जलसंधारणाबरोबरच बंजारा समाजासाठीही मोठ्या प्रमाणात जागृती व विकासाची चळवळ उभी केली. तांड्यावर राहणारा, परंपरेने श्रमप्रधान पण विकासापासून दूर राहिलेला हा समाज एकेकाळी मार्गनिर्मिती, बावड्या बांधकामे आणि पायाभूत कामांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावणारा, समृद्ध इतिहास असलेला समाज आहे. पोहरादेवी येथे सेवालाल महाराजांनी बंजारा समाजासाठी निर्माण केलेली 'काशी' अधिक भव्य, आधुनिक आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करणारी व्हावी, यासाठी सरकारने ७०० कोटी रुपयांचा समग्र विकास आराखडा राबविला. त्यामुळे पोहरादेवीचा संपूर्ण कायापालट झाला असून आज ते राज्यातील महत्त्वाचे सांस्कृतिक व आध्यात्मिक केंद्र बनले आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजींनी प्रथमच बंजारा काशी पोहरादेवीला भेट देत म्युझियमचे उद्घाटन केले. याशिवाय म्युझियममध्ये प्रवेश करताना पहिला पुतळा दिवंगत वसंतराव नाईक साहेबांचा स्थापित करण्यात आला आहे. समाजउन्नती, जागृती आणि परिवर्तनाची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या नाईक साहेबांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

पालकमंत्री संजय शिरसाट म्हणाले, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडून आज दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण होत आहे, हा दिवस खऱ्या अर्थाने बंजारा समाजासह आपल्या सर्वांसाठी दिवाळीप्रमाणेच आहे. महानगर वेगाने वाढत असून महानगर सुंदर झाले पाहीजे, कुंभमेळयासाठी येणारे भाविक छत्रपती संभाजीनगर येथे येतील, त्यादृष्टीने शहराच्या रस्ते तसेच सर्वांगिण विकासासाठी निधीची तरतूद गरजेची असल्याचे ते म्हणाले. दिवंगत वसंतराव नाईक यांचा पुतळा आपल्या सर्वांना प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. महानगरपालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

# नाशकात खळबळ ! तुम्हाला गुप्तधन देतो...भोंदूबाबाचा १५ वर्षे महिलेसोबत धक्कादायक प्रकार

**दि.१६, नाशिक :** धारणगाव येथे सुमारे २५-३० कोटींचे कामाख्यादेवीचे आलिशान मंदिर उभारणाऱ्या भोंदूबाबाने नाशिकमधील महिलेचे लैंगिक शोषण करीत ५० लाखांची फसवणूक केल्याचे प्रकरण उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. तंत्र-मंत्र, तांत्रिक विधी आणि जमिनीत पुरलेल्या 'सोन्याच्या हंड्यांचा खजिना' काढून देण्याचे आमिष दाखवत तब्बल १५ वर्षे महिलेचे लैंगिक शोषण केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी गणेश जयराम जगताप (वय ४७, रा. धारणगाव खडक, कामाख्यादेवी मंदिर, निफाड) या भोंदूबाबाविरुद्ध इंदिरानगर पोलिस ठाण्यात बलात्कार, फसवणूक व अॅट्रॉसिटीसह अनेक कलमांखाली गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. हा भोंदूबाबा पसार झाला असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २०१० मध्ये पीडित महिलेच्या पतीचे दारूचे व्यसन सोडवण्याच्या बहाण्याने भोंदूबाबाने कुटुंबात प्रवेश मिळवला. काही दिवसांतच तू मला खूप आवडतेस... तुला मिळवण्यासाठी मी दीड वर्ष स्मशानात पूजा करतोय असे सांगत त्याने महिलेला मानसिकरीत्या जखडले. त्यानंतर तिचे, पतीचे आणि मुलांची नावे लिहिलेले एक 'तांत्रिक पुस्तक' दाखवत संबंध ठेवले नाही, तर या नावांपैकी कोणाचा तरी बळी जाईल अशी भीती दाखवून आरोपीने पीडितेचे शारीरिक शोषण सुरू केले.

यानंतर तू विशिष्ट जातीची असल्यामुळे तुझ्या उपस्थितीत तंत्र-मंत्र जास्त प्रभावी होतात, असा मनावर बिंबवत महिलेला विविध ठिकाणी पूजाविधीसाठी नेले. पंधरा वर्षे विविध ठिकाणी नेऊन अत्याचार केले. एवढेच नाही, तर सोन्याचा हंडा काढून देतो, शुद्धीकरणासाठी लाखो रुपये लागतील असे सांगून पीडित महिलेच्या निवृत्त वडिलांचे लाखो रुपयांचे निवृत्तिधन, पेन्शन, तसेच 'रेल्वेत नोकरी लावतो' म्हणून भावाकडूनही मोठी रक्कम घेत लाखो रुपयांची फसवणूक केली. दीर्घकाळ त्रास सहन केल्यानंतर अखेर पीडितेने इंदिरानगर पोलिसांकडे धाव घेतली. या तक्रारीवरून संशयित जगताप याच्याविरुद्ध बलात्कार, फसवणूक, धमकी व अनुसूचित जाती अत्याचार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त सचिन बारी तपास करीत आहेत.

**बडे बाबा मच्छिंद्रनाथ ट्रस्टच्या नावाने गंडा**

पाथर्डी गावाजवळ भवानीमाता परिसरात एका आलिशान बंगल्यात 'बडे बाबा मच्छिंद्रनाथ ट्रस्ट'च्या नावाने संस्था काढून संशयिताने स्वतःला मांत्रिक असल्याचे भासवले. जमिनीत सोने दडलेले ठिकाण ओळखतो, पैशांचा पाऊस पाडतो, तांत्रिक पूजा करून खजिना काढून देतो अशा आमिषांनी त्याने अनेकांना जाळ्यात ओढले. रात्रीच्या वेळी विविध ठिकाणी घेऊन जाऊन शुद्धीकरणासाठी मोठ्या रकमांची मागणी करीत नागरिकांची लाखो-कोटींची फसवणूक केल्याचे समजते.




## वर्दीतल्या बल्लवाचार्यांची कथा!

सूर्य पृथ्वीभोवती नव्हे तर पृथ्वीच सूर्याभोवती फिरते,' या ऐतिहासिक सूर्यसिद्धांताचे जनक, पोलंडचे खगोलशास्त्रज्ञ (निकोलस) कोपर्निकस यांच्या नावाच्या मार्गावरच्या राजधानी दिल्लीतल्या जुन्या महाराष्ट्र सदनात, त्यातही या सदनाच्या मागच्या बाजूच्या वाहनतळाजवळून तुम्ही भल्या सकाळी-संध्याकाळी चक्कर मारली तर वासानंच पोटोबा तृप्त व्हावा, अशी भावना होते. येथील उपहारगृहही तिथं जवळच आहे. पण त्या वेळात म साल्यांचा, फोडणीचा वगैरे वास तिथून येत नसतो. मग त्याचा माग काढत काढत, बंद पडलेल्या एटीएम केंद्राच्या मागे गेलात तर आत एका खोलीत साक्षात अन्नपूर्णा अवतरल्याचं वातावरण असतं.

भाज्या चिरणं, फोडणी देणं, चपात्या- पराठ्यांचं पीठ मळणं, जेवण वाढणं अशी विविध कामं करणाऱ्या तरुणांची लगबग तिथं सुरू असते. कोणी भाजीला फोडणी, नव्हे तडका देत असतं, कांदे बटाटे चिरत असतं, एखाद्याला चपाती भाजताना चटका बसतो, कोणाचे कालच्या ड्यूटीतले अनुभव ऐकून मध्येच तिथं हास्यकल्लोळ उसळतो हे तरुण दुसरे तिसरे कोणी नसून जुने व कस्तुरबा गांधी मार्गावरचे नवीन, अशा दोन्ही महाराष्ट्र सदनांत २४ तास डोळ्यांत तेल घालून सुरक्षा देणारे म हाराष्ट्र सुरक्षा दलाचे (एमएसएफ) करड्या गणवेशातले जवान असतात.

महाराष्ट्र सदन हे दिल्लीतलं आतिथ्य घर 'दगडांच्या देशा'चं राजधानीतीलं प्रतीक. राजधानीत लाल किल्ल्याच्या 'अंगणा'तल्या दहशतवादी हल्ल्याचा धसका ताजा असताना इंडिया गेटच्या 'ओसरी'वरच्या महाराष्ट्र सदनांसह महत्त्वाच्या वास्तूंची सुरक्षा हादेखील अती संवेदनशील विषय. महाराष्ट्र सदनांत रोज मेळावे, संमेलनं, महाराष्ट्रीय पदार्थ चाखण्यासाठी खास येणारे, असे नाना कळांचे शेकडो लोक येत असतात. इथल्या सुरक्षेची जबाबदारी असणारे हे जवान आपल्या घरापासून हजारो किलोम ीटरवरच्या राजधानीत ड्युटी करतात.

दिल्लीतला जीवघेणा उन्हाळा, हाडं गोठवणारी थंडी, कधीही कोसळणारा सैराट पाऊस, दर हिवाळ्यातलं विषारी प्रदूषण अशा साऱ्या आव्हानांना झेलत हे जवान शब्दशः २४ तास दोन्ही सदनांच्या प्रवेशद्वारांवर खडा पहारा देतात. त्यातून कोण कधी, कोणाबद्दल प्रशासनाकडं तक्रार करील, याचा नेमच नाही इथं ! या वातावरणात सुरक्षा देणाऱ्या या जवानांची स्वयंपाकघरात 'ड्युटी' लागते तेव्हा त्यांच्या हातांतल्या भांडी-थाळ्या-परातींचा आवाजही 'घंटा किंकिणि नागरा,' असा मधुर भासतो त्या क्षणी! अर्थात व्हीव्हीआयपी मूव्हमेंट लागते तेव्हा स्वयंपाकघरात ड्यूटी लागलेल्यांनाही प्रसंगी सुरक्षेसाठी बोलावून घ्यावं लागतं. अखेर माणसंच आहेत ती, तेव्हा चोखपणे ड्यूटी बजावल्यावर, इतरांना उपद्रव न देता चार विरंगुळ्याच्या क्षणांचा आनंद त्यांनी घेतला तर कोणी नाक मुरडण्याचं कारण नाही ! मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यासाठी पोलिसांपेक्षा वेगळं सुरक्षा दल असावं, या विचारातून २०१०-११ मध्ये एमएसएफची स्थापना झाली. आता मुंबई लोकल सेवा, मेट्रोसह शासकीय रुग्णालयं, बऱ्याच शहरांतल्या विमानतळांसह अनेक ठिकाणी या दलाचे २० हजारांपेक्षा जास्त जवान तैनात आहेत. दिल्लीतल्या महाराष्ट्र सदनाच्या सुरक्षेसाठी ४५ जवान व एक सहायक सुरक्षा अधिकारी असा ताफा असतो. दिल्लीत बाहेरचं जेवण रोज घेणं या सर्वांसाठी आर्थिकदृष्ट्या अशक्य. त्यामुळेच या जवानांनी स्वतःसाठीच एक छोटंसं स्वयंपाकघर उभारलं. ड्यूटीवर असतात त्याच शिस्तीनं व नियोजनबद्ध पद्धतीनं ते किचनचाही कारभार चालवतात ! दरमहा दोन मेस कमांडरर्सची नियुक्ती केली जाते. एक स्वयंपाकी असतोच, पण त्याला सर्व प्रकारची मदत करण्याचं काम हे जवान करतात. सकाळी सहा-साडेसहा आणि संध्याकाळी त्याच वेळेला ते जेवण बनवतात. कांदे-बटाटे कापण्यापासून चपात्या लाटणं-भाजणं, फोडणी देणं, भाज्या चिरणं, पीठ मळणं, नंतर भांडी घासून ठेवणं वगैरे कामंही ते करतात. रोज किमान ३० जवानांचं जेवण इथेच बनतं. प्रत्येकाकडून प्रत्येकी ३२०० रुपये घेतले जातात. दररोज दोन्ही वेळेस किमान १५-२० जवान इथंच जेवण करतात व जे त्या वेळी ड्युटीवर असतात त्यांना डबे जातात. जवळच्याच बाजारातून आठवड्याचा भाजीपालाही हेच जवान आणतात. निवासी आयुक्त आर. विमला वेळोवेळी स्नेहशील आस्थेनं या किचनची विचारपूस करतात. योगायोग पाहा या खाकी वर्दीतल्या बल्लवाचार्यांना अलीकडे प्रशासनिक अधिकारी मिळालेत त्यांचीही ओळख महाराष्ट्र नव्हे, भारतातील एक अग्रगण्य शेफ अशी आहे. सदनाचे सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे हे त्यांचं नाव. अलीकडेच भारत मंडपमम धील भातावरील जागतिक प्रदर्शनात केंद्रीय अन्नप्रक्रिया मंत्रालयानं शेंडे यांना खास आमंत्रित केलं होतं.

# मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करणारे बाळासाहेब!

आज १७ नोव्हेंबर, आजच्याच दिवशी म्हणजे १७ नोव्हेंबर २०१२ रोजी शिवसेनाप्रम ुख बाळासाहेब ठाकरे मराठी माणसांना पोरके करून कायमचे निघून गेले. आज त्यांची १३ वी पुण्यतिथी. बाळासाहेबांचा जन्म २३ जानेवारी १९२६ रोजी झाला. बाळासाहेबांना समाजकार्याचे बाळकडू आपल्या वडिलांकडून म्हणजे प्रबोधनकारांकडून लहानवयातच मि ळाले.

प्रबोधनकारांच्या प्रबोधनाचा, पुरोगामी विचारांचा व आक्रमक वृत्तीचा वारसा बाळासाहेबांमध्येही कळत नकळतपणे उतरला. सर्वप्रथम एक कलाकार, एक व्यंगचित्रकार म्हणून त्यांनी सामाजिक प्रश्नांवर भाष्य करण्यास सुरुवात केली. १९५० साली ते फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले. फ्री प्रेस जर्नलमध्ये व्यंगचित्रकार म्हणून काम करत असतानाच बाळासाहेब विविध संस्थांसाठी, कंपन्यांसाठी व नियतकालिकांसाठी व्यंगचित्रकार तसेच जाहिरात डिझाईनचे कामही करत. याच काळात त्यांची आर. के. लक्ष्मण या विख्यात व्यंगचित्रकाराशी ओळख झाली.

लवकरच या ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले. ही मैत्री शेवट पर्यंत टिकून राहिली. आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब ठाकरे या दोघांनी व्यंगचित्रकलेला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आज व्यंगचित्रकार म्हटले की याच दोघांची नावे समोर येतात. फ्री प्रेस जर्नलमध्ये काही काळ काम केल्यानंतर बाळासाहेबांनी स्वतः चे साप्ताहिक काढण्याचे ठरवले. बाळासाहेब स्वतः व्यंगचित्रकार होते त्यामुळे हे साप्ताहिक व्यंगचित्रात्मकच होते हे वेगळे सांगायला नको. ऑगस्ट १९६७ साली बाळासाहेबांनी 'मार्मिक' हे साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकाला मार्मिक हे नाव प्रबोधनकारांनी सुचवले. ऑगस्ट १९६७ मध्ये महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते मार्मिकच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन झाले.



महाराष्ट्राच्या उद्धारासाठी आणि मराठी माणसाचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी सुरू करण्यात आलेले मार्मिक आजही तितक्याच जोमात सुरू आहे. बाळासाहेबांनी ज्या उद्देशाने हे साप्ताहिक सुरू केले होते तो उद्देश सफल झाला असेच म्हणावे लागेल. मराठी माणसांच्या मुंबईतच मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाला मार्मिकने वाचा फोडली. महाराष्ट्रातच मराठी माणसांची गळचेपी होऊ लागली. मराठीवर अन्याय होऊ लागला हा अन्याय केवळ व्यंगचित्रांच्या फटकाऱ्याने दूर होणार नाही त्यासाठी आणखी संघटित प्रयत्न करायला हवेत असा विचार बाळासाहेबांच्या मनात आला. बाळासाहेबांनी मराठी मणसांना एक करून मोठे संघटन उभारले. या संघटनेला कोणते नाव द्यायचे असे बाळासाहेबांनी प्रबोधनकारांना विचारले. प्रबोधनकारांनी क्षणाचाही विलंब न करता नाव घेतले 'शिवसेना' यानंतर बाळासाहेबांनी १९ जून १९६६ रोजी शिवसेनेची अधिकृत स्थापना केली. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीद घेऊन स्थापन झालेल्या शिवसेनेत तरुणांचा भरणा सुरू झाला. गाव तिथे शाखा असा प्रवास करत अल्पावधीतच शिवसेना महाराष्ट्रभर पसरली. गावागावात, खेड्यापाड्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. शिवसेनेचा पहिला मेळावा ३० ऑक्टोबर १९६६ रोजी शिवतीर्थ मैदानावर संपन्न झाला. या मेळाव्यापासूम शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि शिवतीर्थावरील ( शिवाजीपार्क ) मराठी माणसांची प्रचंड गर्दी असे समिकरणच तयार झाले. शिवतीर्थावर बाळासाहेबांचे भाषण ऐकण्यासाठी राज्यभरातून लोक येत. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित जनसमुदाय भारावून जात. वक्तृत्वाबरोबरच भेदक लेखणी हे देखील बाळासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचे महत्वाचे वैशिष्ट्ये. बाळासाहेबांनी सामना सुरू केल्यावर या लेखणीची ताकद देशाला समजली. सामना मधील बाळासाहेबांच्या अग्रलेखांची वाट पूर्ण महाराष्ट्र पाहत असे. १९९५ साली बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रभर झंझावती प्रचार केला.

संपूर्ण महाराष्ट्रात त्यांनी प्रचारसभा घेतल्या. त्यांच्या सभेला लाखोंची गर्दी होऊ लागली. आपल्या आक्रमक भाषणांनी सत्ताधारी पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले. बाळासाहेबांमुळेच शिवसेना भाजप युतीचे सरकार महाराष्ट्रात स्थापन झाले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. या सरकारने एक रुपयात झुणका भाकर, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपडपट्टी वासीयांना घरे, मुंबई - पुणे हायवे, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बे चे मुंबई नामांतर असे अनेक लोकहिताचे निर्णय घेतले. या सर्व योजना प्रकल्पांची मूळ संकल्पना बाळासाहेबांचीच होती.

आज मुंबई महाराष्ट्रात आहे याचे सर्व श्रेय बाळासाहेबांना जाते. बासाहेबांमुळेच मुंबई महाराष्ट्रात आणि मराठी माणूस मुंबईत दिमाखात राहू शकतो. बाळासाहेब नसते तर मुंबई परप्रांतीयांच्या घशात आणि म राठी माणूस मुंबईच्या बाहेर गेला असता. बाळासाहेबांनीच मराठी माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. बाळासाहेबांमुळेच मराठी माणूस आज ताठ मानेने जगत आहे. मराठी माणसांसाठी त्यांनी जे केले ते इतर कोणत्याही नेत्याला करता आले नाही म्हणूनच मराठी म ाणूस कायम त्यांचा ऋणी राहील. आज त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रातील तमाम मराठी माणूस त्यांना अभिवादन करत आहे. मराठी माणसांच्या मनात स्वाभिमान जागृत करणाऱ्या बाळासाहेबांना विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## मार्मिक बाळासाहेब..



बाळासाहेबांची शैली
जगात धन्य लौकिक
मराठी मातीस लाभे
असा अमुल्यमौक्तीक

हिंदू हृदय सम्राट हा
जग जाणे लौकिक
अयोध्या मंदीर झाले
तुष्ट कारसेवा श्रमिक

मराठी माणसा प्रती
असे विशेषजवळीक
बाँम्बेची केली मुंबई
स्वभावात आगळीक

व्यंगचित्र साप्ताहिक
सर्वत्र गाजले मार्मिक
व्यंग ना ज्याच्या मनी
विचार ते अलौकिक

पक्षाचे मुख पत्र सार्थ
चालवे सामना दैनिक
रक्षण करी समाजाचे
शब्द शस्त्रांचे सैनिक

हिंदूहृदय सम्राट सार्थ
असा न दुजा धार्मिक
अयोध्या मंदिराकरता
कार सेवक कार्मिक

वक्तृत्व प्रभाव लाघवी
जुडले अनेकनागरिक
पक्ष विस्तार विस्तृत
केली अतूट सोयरिक

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक बातमी, अचूक बातमी


# समाजातील विषमता,नैराश्य आणि एकटेपणा..!!

### तरुणाने लग्नासाठी थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाच पत्र लिहिले

अकोल्याच्या ग्रामीण भागातील एका तरुणाचे पत्र सध्या माध्यमांत प्रचंड चर्चेत आहे. वयाची चाळीशी जवळ येत असून आर्थिक परिस्थिती डळमळीत असल्याने त्याचे लग्न ठरत नाही. शेवटी या तरुणाने सम ाजात कुणाकडेही अपेक्षा उरली नाही म्हणून थेट राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनाच पत्र लिहिले. 'माझे वय चौतीस वर्षांचे झाले आहे.

आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे, म्हणून कुणीही मुलगी देत नाही. मला संसार उभा करण्यासाठी जोडीदार मिळवून द्या,' अशी विनंती त्याने केली आहे. या विनंतीत निरागसपणा आहे. काहींना हे पत्र वाचून हसूही येत असेल, परंतु त्याचबरोबर त्यात सम ाजातील विषमता, नैराश्य आणि एकटेपणाचे वास्तवही दडलेले आहे. पूर्वीच्या काळी लग्ने अल्पवयात होत असत. शिक्षण, करिअर किंवा स्थैर्य यांसारख्या गोष्टींना तेव्हा फारसे महत्त्व दिले जात नव्हते. घरातील वडीलधारी मंडळी लग्न ठरवत आणि मुलांनीही त्यांच्या सूचनांचे आज्ञापालन करणे हेच कर्तव्य मानले जात होते. आज मात्र चित्र पूर्णतः बदलले आहे. आधुनिकतेच्या आणि शिक्षणाच्या वाऱ्याने समाजाचा विचार बदलला लला आहे. कुणी मुलगी देता का मुलगी, ही अकोल्यातील तरुणाची हाक महाराष्ट्रातील अनेक तरुणांची प्रातिनिधिक हाक आहे. शरद पवारांसारख्या ज्येष्ठ नेत्यांसमोर ही समस्या मांडून या तरुणाने सामाजिक वास्तवाला व्यापक व्यासपीठावरून वाचा फोडली आहे.

आजचा तरुण आणि तरुणी दोघेही स्वतंत्र विचारांचे, आत्मनिर्भरतेवर विश्वास ठेवणारे आहेत. करिअरची धडपड, शिक्षणाची झेप आणि आर्थिक स्थैर्य मिळवण्याची धडपड या सगळ्यात वयाची पंचविशी ते तिशी नकळत निघून जाते. या काळात लग्नाचा विचार मागे पडतो. विशेषतः शहरांमध्ये हा कल अधिक जाणवतो. ग्रामीण भागातही आता हेच चित्र दिसू लागले आहे. मुलींच्या बाबतीत मात्र परिस्थिती थोडी वेगळी आहे. त्या स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होत आहेत, आत्मनिर्भर होत आहेत. परिणामी त्या 'सेटल झालेला' मुलगा शोधतात. त्यामुळे अनेक तरुणांचे



लग्न केवळ 'अजून स्थिर झालो नाही' या कारणावरून थांबते. लग्न उशिरा होणे किंवा अजिबात न होणे, याचे गंभीर मानसिक परिणाम व्यक्तीवर होतात. समाजात अजूनही 'लग्न झाले का' हा प्रश्न सहज विचारला जातो, पण उत्तर देताना एखाद्या एकाकी व्यक्तीच्या मनात किती गोंधळ असतो, हे हे कोणी पाहत नाही. अशा व्यक्तींना एकटेपणा, न्यूनगंड, आत्मविश्वासात घट आणि कधी कधी नैराश्य यांचा सामना करावा लागतो.

ग्रामीण भागात तर लग्न न होणे ही सामाजिक लाज मानली जाते. काही ठिकाणी तर लग्न न होणे ही बाब थेट त्या व्यक्तीच्या पुरुषत्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. आजच्या पिढीच्या विचारांमध्ये बदल झाल्याचे मान्य

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी.**
**कागल-कोल्हापूर.**

करावेच लागेल. 'लग्न म्हणजे जीवनाचे अंतिम ध्येय नाही', असा विचार तरुणांमध्ये दृढ होत आहे. त्यांना वैयक्तिक स्वातंत्र्य हवे आहे, आपल्या आयुष्याचा अर्थ स्वतः ठरवायचा आहे. काहींना लग्न नको असते, तर काहींना योग्य जोडीदार न मिळाल्याने ते थांबतात. पण समाज मात्र या वैयक्तिक निर्णयाला सहज स्वीकारायला तयार नाही.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातही हेच चित्र दिसते. राहुल गांधी, आदित्य ठाकरे, प्रणिती शिंदे, अदिती तटकरे यांसारख्या तरुण नेत्यांबद्दल माध्यमांमध्ये त्यांच्या लग्नाबाबत नेहमीच चर्चा होते. सलमान खानसारखा लोकप्रिय कलाकार लग्न करत नाही, हेही लोकांना खटकते. समाजात अजूनही लग्न हा एखाद्या व्यक्तीच्या 'पूर्णत्वाचा' निकष मानला जातो. त्यामुळे अविवाहित व्यक्तीबद्दलची उत्सुकता कधी कमी होत नाही. या सर्व घटनांतून एक गोष्ट स्पष्ट होते, लग्न हा विषय केवळ वैयक्तिक नाही, तर तो सामाजिक आणि सांस्कृतिक संरचनेचा अविभाज्य भाग आहे. लग्न न होण्याची समस्या फक्त शहरांपुरती मर्यादित नाही. ग्रामीण भागात ती अधिक तीव्र आहे. शिक्षणाच्या संधींचा अभाव, आर्थिक दुर्बलता, शेतीतील अनिश्चितता, जातीय बंधने आणि समाजातील परंपरागत विचारसरणी यामुळे तिथल्या तरुणांना लग्न करणे अधिक कठीण जाते. दुसरीकडे, शहरी भागात लग्न उशिरा होण्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षण, नोकरीतील ताण, योग्य जोडीदार शोधण्यातील अडचणी आणि वैयक्तिक स्वातंत्र्याबद्दलची जाणीव. म्हणजेच, दोन्हीकडे समस्या आहे, पण स्वरूप भिन्न आहे. समाजाने या बदलत्या वास्तवाकडे समजुतीने पाहण्याची गरज आहे.

तरुणांच्या अपेक्षा अवास्तव असतील तर त्या कमी करणे आवश्यक आहे, परंतु त्यांच्या स्वप्नांवर गदा आणता कामा नये. पालकांनी, समाजाने आणि नाणि शासनाने या विषयावर खुला संवाद यावर खुला संवाद घडवून आणावा. गावागावांत युवक-युवतींसाठी संवाद, समुपदेशन आणि विवाहयोग कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. आर्थिक परिस्थितीमुळे लग्न न होणाऱ्यांसाठी शासनाने विशेष योजना आखल्या पाहिजेत. ग्रामीण भागातील तरुणांना आत्मनिर्भर बनविणे, शिक्षण व रोजगाराच्या संधी वाढविणे आणि त्यांना आत्मविश्वास देणे हेच या समस्येवरचे खरे उत्तर आहे. शरद पवारांना लिहिलेले पत्र हे कदाचित एका तरुणाचा हताश प्रयत्न असेल, पण त्या पत्राने समाजाला आरसा दाखवला आहे. तो आरसा सांगतो, आपण शिक्षित झालो, आधुनिक झालो, पण अजूनही म ाणसाच्या एकटेपणाकडे दुर्लक्ष करत आहोत. अशा एकटेपणात हरवलेल्या चेहऱ्यांमध्ये अकोल्याच्या त्या तरुणाचा चेहराही आहे..

साधा, प्रामाणिक, पण आतून थकलेला ! त्याचे पत्र हसत-खेळत सोशल मीडियावर फिरत असले तरी ते आपल्या समाजाला एक प्रश्न विचारते, 'लग्नाचे वय कोण ठरवते? सम ाज की व्यक्ती?' आणि हा प्रश्न ज्या दिवशी आपण मनापासून विचारू लागू, त्या दिवशी या विषयावरचे हसे नाहीसे होईल आणि संवेदनशीलता उरेल.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## सोयगाव तालुक्यात सोमवारपासून कुष्ठरोग शोध अभियान

### तालुक्यात १ लाख २९ हजार नागरिकांची तपासणी होणार

**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.१६, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** सायगाव तालुक्यात कुष्ठरोग प्रसार शून्यावर आणण्यासाठी सोमवार, दिनांक १७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ रोजी दरम्यान 'कुष्ठरोग शोध अभियान' राबविण्यात येणार आहे. अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गीतेश चावडा यांनी दिली आहे. सोयगाव तालुक्यातील सर्व गावात कुष्ठरोग शोध अभियान राबविण्यात येणार आहे. हे अभियान १४ दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येणार आहे. शासनाने सन २०२७ पर्यंत शून्य कुष्ठरोग प्रसाराचे ध्येय निश्चित केले आहे. या ध्येयाच्या अनुषंगाने, कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त नवीन कुष्ठरोग शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानात समाजातील निदान न झालेले कुष्ठरोग लवकरात लवकर शोधून काढणे, असे उपक्रम राबविण्यात येणार आहे.

**नागरिकांनी या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन**

नवीन सांसर्गिक कुष्ठरोग शोधून बहुविध औषधोपचार याद्वारे संसर्गाची साखळी खंडित करणे आणि त्यामुळे होणारा प्रसार कमी करणे. तसेच समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. तरी नागरिकांनी कुष्ठरोग निर्मूलनाच्या ध्येयपूर्तीसाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे तालुका आरोग्य विभागाने केले आहे.

**घरोघरी तपासणीसाठी २०८ आरोग्य कर्मचारी**

सोयगाव तालुक्यात हे अभियान घरोघर सर्वेक्षणाद्वारे राबविण्यात येणार असून अभियानात १ लाख २९ हजार ३८६ इतक्या लोकांची तपासणी करण्यात येणार आहे. त्यासाठी एकूण दहा पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. १४ दिवसाच्या कालावधीत ही मोहीम राबविण्यात येईल.या सर्वेक्षणादरम्यान, पथकातील सदस्य घरातील सर्व सभासदांची कुष्ठरोगाबाबत शारीरिक तपासणी करतील. महिला सभासदांची तपासणी 'आशा' मार्फत आणि पुरुष सभासदांची तपासणी पुरुष स्वयंसेवकांमार्फत केली जाईल. दरम्यान, त्वचेवर फिकट लालसर बधिर चट्टे, ज्याठिकाणी घाम येत नाही, त्वचा जाड, बधिर चकचकीत असणे आदी कुष्ठरोगाची लक्षणे असून अशा नागरिकांनी तपासण करणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले.

## कुष्ठरोग शोध अभियान मोहिमेबाबत आढावा बैठक संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, ठाणे :** जिल्हाधिकारी तथा जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात कुष्ठरोग शोध अभियान मोहिमबाबत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ.मनिष रेंघे तसेच तालुक्यातील आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दि.१७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत ठाणे जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या कुष्ठरोग शोध अभियानाचा आढावा घेतला. याप्रसंगी जिल्हा रुग्णालय कल्याण समितीची बैठक, जिल्हा एकात्मिक सोसायटी नियामक मंडळ सभा, संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समिती, जिल्हा जननी सुरक्षा समिती, जिल्हा सिकलसेल समिती, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समिती, नियमित लसीकरण समिती, १५ वित्तीय आयोग जिल्हा सनियंत्रण समिती यांचे संगणकीय सादरीकरण पाहून त्यात सूचना करुन मोहिम यशस्वी करावी, अशा जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी सूचना केल्या.

## भाईंदरच्या ज्येष्ठ नागरिकांनी सादर केला आनंदाश्रम नाटकाचा प्रयोग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, गिरगाव (मुंबई) :** महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धा २०२५-२६ मध्ये नुकतेच साहित्य संघ मंदिर गिरगाव येथे, ज्येष्ठ नागरिक विरंगुळा संस्था भाईंदर (पू) यांच्यावतीने, आनंदाश्रम नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. नाट्यरसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रसंगानुरूप टाळ्यांची दाद घेत, एका आगळ्यावेगळ्या विषयावर आधारित, मस्त नाटकाची मेजवानी रसिकांना घेता आली. विशेष म्हणजे या नाटकात भूमिका करणारे सर्व कलाकार हे ज्येष्ठ नागरिक आहेत. संस्थेचे अध्यक्ष शंकर जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली, ज्येष्ठ नाटककार, सदाशिव चव्हाण लिखित आणि दिग्दर्शित, आनंदाश्रम हे नाटक शासनाच्या स्पर्धेत सादर करण्यासाठी बसवण्यात आले. वृद्धाश्रमातील माणसांच्या जीवनावर आधारित, या नाटकात वृद्धांच्या कथा आणि व्यथा मांडल्या आहेत. त्याला तरुणाईतील प्रेमिकांच्या असफल झालेल्या प्रेमाची किनार लावून, त्याच्या जोडीला विनोदाची झालर लावली असल्याने, नाटक पाहताना, ज्येष्ठा बरोबर तरुणाई ही आठवणीत रममाण होते. हे या नाटकाचे यश आहे.

वृध्दाश्रमातील दिनचर्या, करमणूकीचे कार्यक्रम, व्यायाम तसेच भावनिक प्रसंग दाखवून, लेखकाने पूर्वाश्रमीच्या प्रेमिकांची पुनर्भेट घडवून आणताना, त्यांना पुनर्विवाह करण्याचा गोड आणि आशावादी मार्ग दाखवला आहे. या नाटकात, श्रीधरकाका (भूपाल चव्हाण), जानकी (शारदा गावडे), देवकी (सरोज गाजरे) यांच्या मध्यवर्ती भूमिका असून त्यांच्या सोबत, भटजी (विश्वनाथ वालावलकर), अनिता/चंद्रा (अंकिता मोरे), राकेश/राम (चंद्रकांत गुरव), शंभूनाना (सुर्यकांत म्हात्रे), सावंत (प्रकाश पाटील), वागळे (जगदीश अबगुल) , सीता (श्रध्दा शेजवाडकर), गीता (शरयू तळेकर) आणि केवळ पाच वर्षांची एकमेव बालकलाकार संस्कृती (हिमांशी बेळमकर) या मुलीची भूमिका आहे.या नाटकात, संस्थेतील कवी भूपाल चव्हाण, यांच्या कवितांची, योग्य ठिकाणी पेरणी केलेली आहे. त्यामुळे कविताप्रेमीनाही त्याचा आनंद घेता येतो. एकंदरीत हे नाटक पाहून प्रत्येक नाट्यरसिक आनंदाश्रमातील आनंद घेऊन परतताना दिसले.

# 'क्रिकेटसाठी हवी ती मदत करेन' - राज ठाकरेंचं MCA ला आश्वासन



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१६, मुंबई :** राज्याची राजधानी मुंबईला क्रिकेटची पंढरीही म्हटलं जातं, याच क्रिकेट पंढरीतील एमसीए म्हणजेच मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या (MCA) निवडणुकीत अजिंक्य देसाई बिनविरोध अध्यक्ष बनले. उपाध्यक्ष, सचिव आणि इतर पदांसाठी झालेल्या निवडणुकीनंतर सर्व विजयी उमेदवारांनी सर्वपक्षीय नेत्यांची भेट घेऊन आभार मानले आहेत.

या निवडणुकीच्या निमित्ताने भाजप आणि शरद पवारांची राष्ट्रवादी एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. अजिंक्य नाईक यांच्यासह सर्वच पदाधिकाऱ्यांनी काल मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आणि सचिव मिलिंद नार्वेकर हे ही राजभेटीसाठी शिवतीर्थ बंगल्यावर आले होते.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत विजयी झाल्यानंतर सर्व विजयी उमेदवारांसोबत आमदार मिलिंद नार्वेकर हे देखील राज ठाकरे यांच्या भेटीसाठी शिवतीर्थ बंगल्यावर पोहोचले होते. विशेष म्हणजे, मनसेच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच म्हणजे तब्बल २० वर्षानंतर मिलिंद नार्वेकर हे राज ठाकरेंना प्रत्यक्ष भेटले आहेत. दरम्यान, राज ठाकरेंनी सर्व पदाधिकाऱ्यांचं अभिनंदन करत क्रिकेटच्या मदतीसाठी त्यांना आश्वासन ही दिलं.

'क्रिकेटसाठी शक्य ती मदत करणार', असं राज ठाकरे यांनी म्हटलं. राजकारण बाजूला ठेवून एमसीए निवडणुकीत उतरलेल्या सर्वच राजकीय पक्षांचे अजिंक्य नाईक यांनी यावेळी आभार मानले. याशिवाय, शिवतीर्थावर अनेक गोष्टींची चर्चा झाली.मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर उपाध्यक्षपदी जितेंद्र आव्हाड यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत जिंतेंद्र आव्हाडांनी नवीन शेट्टी यांचा ४८ मतांनी पराभव केला. तर, सचिव पदावर उन्मेष खानविलकर यांनी विजय मिळवला असून त्यांनी शाह आलम शेख यांचा पराभव केला. एमसीएच्या अध्यक्षपदी अजिंक्य नाईक यांची या आधीच बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत एकूण ३६२ जणांनी मतदानाचा हक्क बजावला. दरम्यान, अजिंक्य नाईक यांनी सांगितलं की, राज ठाकरे यांचा क्रिकेटला नेहमीच पाठिंबा असतो. नाईक यांनी असेही नमूद केलं की, त्यांचे सदस्य बिनविरोध निवडून आले असून, क्रिकेट हा एक असा खेळ आहे ज्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार, उद्धव ठाकरे, आशिषजी, अजित पवार, एकनाथ शिंदे यांसारख्या अनेक राजकीय नेत्यांचा पाठिंबा मिळतो.

## निवडणूक निरिक्षक कुंभार यांची बुलडाणा नगरपरिषदेला भेट



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** बुलडाणा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी निवडणूक निरिक्षक शंकर कुंभार यांनी बुलढाणा नगरपरिषदेला भेट दिली.

यावेळी त्यांनी नामनिर्देशन, प्रभाग रचने बाबतची माहिती घेतली. तसेच सुरक्षा कक्ष (स्ट्रांग रुम), मतदान केंद्राची माहिती घेत मतदान केंद्राना भेट दिली. निवडणुकीसंबंधी सुरु असलेल्या कामाकाजाबाबत समाधान व्यक्त केले. यावेळी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्माण अधिकारी शरद पाटील, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, उपमुख्याधिकारी आदी कर्मचारी उपस्थित होते.

## बंगलवस्ती शाळेतील मुलांचा बालकुमार मराठी साहित्य संमेलनात सहभाग



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, पुणे :** पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेले बालकुमार मराठी साहित्य संमेलन २०२५ बालगंधर्व रंग मंदिर पुणे येथे संपन्न झाले. या कार्यक्रमात जि.प.शाळा बंगलवस्ती येथील विद्यार्थ्यांना सहभागाची संधी मिळाली. माझी गोष्ट माझे पुस्तक या उपक्रमांतर्गत शाळेतील ६ विद्यार्थ्यांची स्वलिखित पुस्तके प्रकाशित करण्यात आली. तसेच ३५० पेक्षा अधिक पुस्तकांमधून ३५ निवडक पुस्तकांच्या लेखकांना साहित्य संमेलनात सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती. त्यात बंगलवस्ती शाळेतील कु. आराध्या अडसूळ व कु. मोक्षदा आटोळे या दोन विद्यार्थिनींना सहभाग मिळाला. या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना ज्येष्ठ बालसाहित्यीक लेखिका माधुरी पुरंदरे व मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळाली. या विद्यार्थिनींना शाळेतील शिक्षिका वर्षा अडसूळ व शैलजा मोटे यांनी मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

## 'नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर' युएएफ एक्सपोचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या हस्ते उद्घाटन




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१६, मुंबई :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणारे आहे. हे शैक्षणिक धोरण अतिशय व्यावहारिक तसेच सर्जनशीलतेस बळ देणारे आणि आधुनिक स्पर्धेत विद्यार्थ्यांना पुढे नेणारे आहे असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केले.

विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे डिझाईन क्षेत्रातील भविष्यातील संधीसाठी उर्मीज आर्ट फोरम तर्फे आयोजित 'नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर' या युएएफ एक्सपोचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते झाले.

मंत्री चंद्रकांत पाटील नवे शैक्षणिक धोरण व्यावहारिक असून, यात संशोधनावर ही भर देण्यात आला आहे. याशिवाय नव उद्योजक, स्टार्टर्स अप यांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्यासाठी कमी व्याजावर कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून मदतही केली जात आहे. यातूनच स्टार्टअपच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणालेकी, उर्मीजच्या कला मंचा तर्फे डिझाइनला शालेय स्तरावरील सर्जनशीलता आणि करिअरच्या संधी तसेच एक्स्पोच्या माध्यमातून एकाच छताखाली पोर्टफोलिओ प्रदर्शन, करिअर समुपदेशन, विद्यापीठ भागीदारी आणि उद्योग संवाद आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारे असे उपक्रम प्रेरणादायी ठरतील. अशा उर्मीजच्या कला मंचा एक्स्पोमुळे महाराष्ट्रातील डिझाइन गुणवत्तेला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध होतील.

मुलांच्या शिक्षणात आणि विकासात कला आणि सर्जनशील विषयांची भूमिका महत्त्वाची असते. डिझाइन हा आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अविभाज्य भाग बनला आहे, डिझाईन आता केवळ चित्रकलेपुरते मर्यादित न राहता विज्ञान, सौंदर्यशास्त्र, मानवी गरजा आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणारे एक व्यापक व्यावसायिक क्षेत्र आहे. एक्स्पोचे आयोजन हे महाराष्ट्रातील सर्जनशीलतेला योग्य दिशा देणारे पाऊल ठरणार आहे, असे मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

भारताच्या प्रगतीचा पाया डिझाइन थिंकिंगमध्येच आहे. अभियांत्रिकी, वास्तुकला, उत्पादन, ॲनिमेशन, गेमिंग, डिजिटल कंटेंट, तंत्रज्ञान आदी सर्व क्षेत्रांत डिझाइन नवोपक्रमाची मुख्य ताकद बनली आहे. नवीन अभ्यासक्रम कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) एआर/व्हीआर (Augmented Virtual Reality) UX/UI Creative Technologies बरोबर उद्योग-शैक्षणिक सहकार्य वाढवून विद्यार्थ्यांना हॅंड्स-ऑन, व्यावहारिक, प्रोजेक्ट-आधारित शिक्षण आणि मोठ्या प्रमाणत रोजगार निर्मिती करण्यात येत आहे. असेही मंत्री पाटील यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर आमदार. पराग अळवणी, उर्मीज आर्ट फोरमच्या संस्थापिका, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या कोमल उल्लाल, गुरुचरण सिंग संधू, क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, मोहन वेदपाठक आदी उपस्थित होते.

# एकनाथ शिंदेंना पुन्हा मोठा धक्का, नाराजी भोवली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, नाशिक :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाकडून करण्यात आली आहे. येत्या दोन डिसेंबरला राज्यात नगरपंचायत आणि नगर परिषद निवडणुकांसाठी मतदान होणार आहे, तर तीन तारखेला मतमोजणी होणार. दरम्यान आता उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. इच्छुकांना उमेदवारी जाहीर करताना सर्वच पक्षांना तारेवरची कसरक करावी लागत असल्याचं चित्र आहे. इछुक उमेदवाराला जर उमेदवारी मिळाली नाही तर तो इतर पक्षात जाऊ शकतो, त्याचा फटका आपल्याला निवडणुकीत बसू शकतो अशी भीती सर्वच पक्षांना आहे, त्यामुळेच ही निवडणूक अनेक ठिकाणी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नाशिकमधून मोठी बातमी समोर येत आहे.

ती म्हणजे नाशिकमध्ये शिवसेना शिंदे गटाला मोठा धक्का बसला आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर इगतपुरीमध्ये शिवसेना शिंदे गटाला खिंडार पडलं आहे. युवा सेन तालुका उपाध्यक्ष शहराध्यक्ष, उपशहराध्यक्ष यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी पक्षाचा सामूहिक राजीनामा दिला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार निवडणूक प्रक्रियेत विश्वासात न घेता परस्पर उमेदवार दिल्याने हे पदाधिकारी नाराज आहेत.

उमेदवारी जाहीर करताना पक्षात काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा विचार झाला नाही. ऐनवेळी पक्षात प्रवेश केलेल्यांना उमेदवारी देण्यात आली. आम्ही दोन वर्षांपासून पक्ष उभारतोय, मात्र यांनी ऐनवेळी पक्षाच्या हिताचे राजकारण न करता स्वार्थाचे राजकारण केल्याचा आरोप राजीनामा दिलेल्या पदाधिकाऱ्यांकडून शिवसेनेच्या काही वरिष्ठ नेत्यांवर करण्यात आला आहे.

दरम्यान या सर्व पदाधिकाऱ्यांनी आता जिल्हाध्यक्ष डी जी सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला आहे, समोर आलेल्या माहितीनुसार यातील काही जणांना ठाकरे गटाकडून उमेदवारी देखील देण्यात आली आहे. दरम्यान ऐन निवडणुकीच्या तोंडावर हा शिवसेना शिंदे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर होणारे हे पक्षप्रवेश सर्वच पक्षांसाठी आता डोकेदुखीचा विषय ठरत आहेत. नाराज इच्छुकांची समज काढताना पक्षातील वरिष्ठ नेत्यांची मात्र तारेवरची कसरत सुरू असल्याचं पहायला मिळत आहे.

# बिबट्याच्या बंदोबस्तासाठी ग्रामस्थांचा रास्ता रोको

## खारेकर्जुने, निंबळक परिसरात घराबाहेर पडणे मुश्किल

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, अहिल्यानगर :** अहिल्यानगर तालुक्यातील निंबळक व परिसरातील हिंगणगाव, हमीदपूर, इसळक, खारेकर्जुने आदी गावांमध्ये सलग २ - ३ दिवसांपासून बिबट्याचे लहान मुलांवर हल्ले सुरू आहेत. या बिबट्यामुळे परिसरात प्रचंड दहशत निर्माण झाली असून लोकांचे घराबाहेर पडणे मुश्किल झाले आहे. या बिबट्याचा कायमचा बंदोबस्त करा, गोळ्या घाला, पिंजरे बसवा या मागणीसाठी दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी निंबळक गावात तसेच निंबळक बायपास चौकात सकाळी ११ वाजता संतप्त ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन केले. गेल्या दोन दिवसांपासून नगर तालुक्यातील खारेकर्जुने, निंबळक परिसरात बिबट्याची दहशत सुरू आहे.



माणसांवर, पाळीव प्राण्यांवर हल्ले करून जखमी तसेच ठार मारण्याच्या घटना घडत आहेत. खारेकर्जुने येथे एका मुलीला उचलून नेऊन तिचा जीव घेतला ही घटना ताजी असतानाच निंबळक येथे मुलाला बिबट्याने जखमी केले. शनिवारी सकाळी पाळीव प्राण्यांवरही हल्ले केले गेले आहेत. कोंबड्या, शेळ्या, बकर्या फस्त केल्या. या सर्व घटनेमुळे हिंगणगाव, हमीदपूर, निंबळक, इसळक, खारेकर्जुने परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

शाळा व महाविद्यालय बंद आहेत. या बिबट्याचा कायमचा बंदोबस्त करण्याच्या मागणीसाठी दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी ग्रामस्थांनी निंबळक येथील दत्त मंदिर चौक आणि निंबळक बायपास चौकात रास्ता रोको आंदोलन केले. यावेळी वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात होता. यावेळी माजी जि.प.सदस्य प्रताप शेळके, उद्योजक अजय लामखडे, माजी उपसभापती डॉ.दिलीप पवार, सरपंच प्रियंका लामखडे, बी.डी. कोतकर, माजी उपसरपंच घनश्याम म्हस्के, नाना दिवटे व ग्रामस्थ उपस्थित होते. वन अधिकाऱ्यांनी बिबट्याला पकडण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन मागे घेतले.

# निळजे रेल्वे ओव्हर ब्रिज पाडकामामुळे कल्याण-डोंबिवलीत वाहतूक बदल

## १६ नोव्हेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत मोठे निर्बंध लागू

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१६, कल्याण (ठाणे) :** कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील निळजे रेल्वे ओव्हर ब्रिज पाडून नव्याने बांधकामाचे महत्त्वाचे काम टाटा प्रोजेक्ट्स लिमिटेड तर्फे हाती घेण्यात आले आहे. Express Freight Railway Consortium Dedicated Freight Corridor Project (JNPT-Vaitarana Section - CTP-11) अंतर्गत हा पूल डबल डेकर कंटेनर वाहतुकीस अडथळा ठरत असल्याने त्याचे पुनर्निर्माण करण्यात येत आहे.सदर कामाचे भूमिपूजन कल्याण ग्रामीण आमदार राजेश मोरे यांच्या हस्ते पार पडले. यावेळी टाटा प्रोजेक्ट्सचे अधिकारी, तसेच वाहतूक शाखा कोळसेवाडीचे पोलीस उपनिरीक्षक कृष्णा कावडे उपस्थित होते. हे काम १६ नोव्हेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ००:०१ पासून ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. कामाच्या सुरळीततेसाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट यांनी मोटार वाहन कायदा कलम ११५ व ११६ नुसार वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी केली आहे.

**मुख्य मार्गांवरील प्रवेशबंदी व पर्यायी मार्ग**

१) कल्याण → शिळफाटा मार्ग (निळजे कमाना परिसर) बंद

पर्यायी मार्ग :

निळजे कमान → उजवीकडे वळून लोढा पलावा → महालक्ष्मी हॉटेल → पुढे इच्छित स्थळी

२) लोढा पलावा / एक्सपिरिया मॉल फ कल्याण मार्ग बंदपर्यायी मार्ग:शिळफाटा → देसाई खाडी ब्रिज फ सरस्वती टेक्सटाईल समोर यूटर्न फ नवीन पलावा फ्लायओव्हर

३) मुंब्रा–कल्याण फाटा → कल्याण (६-चाकी व जड वाहनांना प्रवेशबंदी)पर्यायी मार्ग:

कल्याण फाटा → शिळफाटा → मुंब्रा बायपास → खारेगाव टोलनाका

४) कल्याण → कल्याण फाटा (जड वाहनांना बंदी)

पर्यायी मार्ग:

काटई चौक → खोणी नाका → तळोजा MIDC

५) तळोजा MIDC → काटई चौक (जड वाहनांना बंदी) पर्यायी मार्ग:

खोणी नाका → निसर्ग हॉटेल → बदलापूर पाईपलाइन → नेवाळी

६) अंबरनाथ/बदलापूर → काटई चौक (जड वाहनांना बंदी) पर्यायी मार्ग:

खोणी नाका → डावीकडे तळोजा MIDC मार्ग

**हलके वाहनांसाठी पर्यायी रस्ते**

मुंबई/नवी मुंबई/ठाणे → कल्याण दिशेने कल्याण



फाटा → शिळफाटा → दिवा–सांडप रोड → मानपाडा → कल्याण–शिळ रोड किंवा

नाशिक–मुंबई महामार्ग → मानकोली → मोगाव → डोंबिवली किंवारांजनोली → कोनगाव → कल्याण कल्याण/उल्हासनगर → मुंबई/नवी मुंबई दिशेने चक्कीनाका → श्री मलंग रोड → नेवाळी → बदलापूर पाईपलाइन → खोणी → तळोजा MIDC कल्याण/डोंबिवली → ठाणे/मुंबई दिशेने

डोंबिवली → मोटागाव → मानकोलीकिंवादुर्गाडी → कोनगाव → नाशिक–मुंबई महामार्ग अत्यावश्यक सेवांना सूट रुग्णवाहिका फायर ब्रिगेडपोलीस वाहनेइतर आपत्कालीन सेवाया वाहनांना प्रवेशबंदी लागू होणार नाही. नागरिकांसाठी आवाहननिळजे पुलाचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने प्रवाशांनी दिलेले पर्यायी मार्ग वापरावेत आणि वाहतूक पोलिसांच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन प्रशासन व वाहतूक विभागाने केले आहे.

# नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र (भारत) संस्थेची २०२५-२८ कार्यकारणी जाहीर; अध्यक्षपदी रवींद्र मटकर

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१६, मुंबई :** नमन लोककला आणि लोककलावंतांच्या न्याय हक्कासाठी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करत राज्य शासनाला नमन महोत्सव सुरू करायला भाग पाडणारी कोकण कलाविश्वातील अग्रगण्य संस्था अर्थात नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र अखंड भारत (रजि) ह्या संस्थेची रविवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी, वाघे हॉल परळ मुंबई येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष रवींद्र मटकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष जनरल सभा संपन्न झाली.

सदर सभेत मागील त्रिवार्षिक इतिवृत्त /कार्य अहवाल तसेच मागील आर्थिक वर्षाचा जमा खर्च व अहवाल सदर करून मंजूरी घेण्यात आली. आगामी वार्षिक नमन जागर कार्यक्रमाच्या नियोजनपर विचार विनीमय करून जागर कार्यक्रमाचे नियोजन निश्चित करण्यात आले. त्याचबरोबर त्रिवार्षिक २०२५ ते २०२८ कार्यकाळासाठी नूतन कार्यकारणी निवड करण्यात आली असून अध्यक्षपदी रवींद्र मटकर (राजापूर), उपाध्यक्ष रमाकांत जावळे (चिपळूण), राजाराम फापे (लांजा), सरचिटणीस शाहिद खेरटकर (चिपळूण), सहसचिव सुधाकर मास्कर (गुहागर), तुषार पंदेरे (लांजा), खजिनदार दिपक कारकर (चिपळूण), सदस्य प्रकाश मालप (रत्नागिरी), सागर डावल (गुहागर), प्रशांत भेकरे (गुहागर) याप्रमाणे नूतन कार्यकारणी सर्वानुमते निवड करण्यात आली असून उपरोक्त संस्थेच्या वतीने लवकरच नमन जागर-२०२५-२६ तसेच नमन लोककलावंत परिषद सारखे महत्वपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे अध्यक्ष रवींद्र मटकर यांनी मनोगतीय भाषणातून व्यक्त केले. सभेत नमन लोककला संवर्धन हेतू तसेच नमन लोककलावंत,संस्थेच्या हितार्थ



महत्वपूर्ण चर्चा तसेच ठराव मंजूर करण्यात आले. सदर सभेला न.लो.संस्थेचे मुंबई शाखा अध्यक्ष चंद्रकांत धोपट सह कार्यकरणी, गुहागर शाखा सदस्य अमित काताळे, गुहागर शाखा खजिनदार उदय दणदणे, राजापूर शाखा मुंबई अध्यक्ष सुरेश मांडवकर, खजिनदार पिंकेश बापर्डेकर आदी शाखांचे पदाधिकारी सदस्य तसेच नमन मंडळाचे प्रतिनिधी, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कापूस खरेदीची सीसीआय मर्यादा मागील वर्षीप्रमाणेच कायम ठेवण्याची आ.मुनगंटीवारांची मागणी

**अक्षरीज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान वाचविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. सीसीआयने (कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) जाहीर केलेली कापूस खरेदीची मर्यादा चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी नुकसानदायक असून ही मर्यादा मागच्या वर्षीप्रमाणे कायम ठेवावी, अशी आग्रही मागणी आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

यासंदर्भात त्यांनी सीसीआयच्या संचालकांसोबतही दूरध्वनीवर चर्चा केली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविलेल्या पत्रात आमदार सुधीर



मुनगंटीवार म्हणतात, 'महाराष्ट्र कृषी विभागाने चालु हंगाम सन २०२५-२६ मध्ये कापसाची उत्पादकता ही प्रती हेक्टरी १२.८० क्विंटल ग्राह्य धरून पणन मंत्रालयामार्फत केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालयाला पाठवली आहे. त्यानुसार सीसीआयने चालु हंगामातील प्रती हेक्टरी १३.५७ क्विंटल ग्राह्य धरून कापुस खरेदीची मर्यादा जाहीर केली. परंतु, प्रत्यक्षात चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी हा प्रती हेक्टरी सरासरी २५ ते ४० क्विंटल कापसाचे उत्पन्न घेत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे सीसीआयमार्फत कापूस विक्री करीता मोठी अडचण निर्माण झाली आहे.' सन २०२४-२५ या वर्षात या दोन्ही जिल्ह्यांसाठी सीसीआयने प्रती हेक्टरी ३० क्विंटल ही मर्यादा जाहीर केली होती. त्याप्रमाणे शेतकरी बांधवांनी कापूस विक्रीची प्रक्रिया देखील पूर्ण केली होती. चालू हंगामातील प्रती हेक्टरी क्विंटल मर्यादा फारच कमी असल्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे चालू वर्षात देखील प्रती हेक्टरी ३० ते ४० क्विंटल ग्राह्य धरून कापूस खरेदीची मर्यादा जाहीर करावी, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. सन २०२५-२६ या चालू हंगामात ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक उत्पादन घेणाऱ्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उर्वरीत कापूस एमएसपी पेक्षा कमी दरात व्यापाऱ्यांना विकण्याची वेळ येणार नाही. याकरीता सीसीआयमार्फत कापूस खरेदीची मर्यादा मागील वर्षीची कायम ठेवून चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही यादृष्टीने प्रशासनाला आदेश द्यावे, असे आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे. त्याचवेळी सीसीआयचे संचालक ललितकुमार गुप्ता यांच्याशी देखील आ. मुनगंटीवार यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. शेतकऱ्यांचे संभाव्य नुकसान त्यांच्या लक्षात आणून दिले. त्यावर गुप्ता यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शेतकऱ्यांच्या कल्यासाठी सदैव तत्पर असलेले आ. मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा एका महत्त्वाच्या विषयावर पुढाकार घेतला आहे.

# थोडक्यात

## थेट गोठ्यावर दुभत्या जनावरांची तपासणी व औषधोपचार



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१६, पारनेर (अहिल्यानगर) :** दूध उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन व दिलासा देण्यासाठी नेस वाडिया फौंडेशनच्या वतीने तालुक्यातील कान्हुरपठार येथे नुकताच एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला आहे. पशुधनाच्या वाढत्या किमती व पशुधन आरोग्य आणि काळजी या शीर्षकाखाली सुरू केलेल्या या उपक्रमांतर्गत थेट गोठ्यावर जाऊन २५० दुधाळ जनावरांची तपासणी व औषधोपचार करण्यात आली. नेस वाडिया फौंडेशन आणि कान्हुर पठार ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली, ज्यामुळे शेतकरी वर्गाला मोठा दिलासा मिळाला आहे.तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने गावातील अनेक दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या गोठ्यांवर भेटी दिल्या. यावेळी दुभत्या जनावरांची गोठ्यावर जाऊन सखोल आरोग्य तपासणी करण्यात आली. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी जनावरांमधील त्वचा रोगांसह विविध आरोग्य समस्यांवर उपचार केले. तसेच, शेतकऱ्यांशी संवाद साधून दुध व फॅट वाढविण्यासाठी कोणता खुराक देण्यात यावा यासंबंधीचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या तपासणीनंतर आवश्यक ती औषधे मोफत देण्यात आली.

पहिल्या टप्प्यात जवळपास २५ गोठ्यातील २५० दुभत्या गायांची तपासणी व औषधोपचार करण्यात आले. यामध्ये आघाडीवर असणारे दुध उत्पादक शेतकरी प्रकाश पोटे, विलास नवले, तुषार ठुबे, दत्तात्रय ठुबे, गोकुळ ठुबे यांच्या गोठ्यांचा समावेश आहे. तपासणी सोबत पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून जनावरांची काळजी कशी घ्यावी, आहार कसा असावा, आणि आजारांपासून बचाव कसा करावा, याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. या उपक्रमाने शेतकरी बांधवांना त्यांच्या पशुधनाची काळजी घेणे अधिक सोपे होणार असून, पशुधन निरोगी राहण्यासाठी त्यांना मोलाची मदत मिळणार आहे. कान्हुरपठार ग्रामपंचायत व नेस वाडिया फाउंडेशन यांनी सुरू केलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी सरपंच संध्या ठुबे, गणेश तांबे, यांच्यासह उपक्रम समितीचे सदस्य चंद्रभान ठुबे, श्रीकांत ठुबे, गणेश गायके, हरिभाऊ व्यवहारे मेजर, धनंजय ठुबे, राहुल व्यवहारे तसेच शेतकरी उपस्थित होते.

## शाळा हे संस्काराचे केंद्र असून विद्यार्थ्यांनी देशाप्रती सजग असावे - नंदिनी चुनारकर

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१६, चंद्रपूर :** शाळा हे संस्काराचे केंद्र असून विद्यार्थ्यांनी देशाप्रती सजग राहण्याचे आवाहन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद चंद्रपूर अशासकीय सदस्य नंदिनी चुनारकर यांनी केले. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा शिवणी चोर येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम त्याचप्रमाणे राष्ट्रीय गीत वंदेमातरम, पंडित जवाहरलाल नेहरू, भगवान बिरसा मुंडा या विषयावर आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा बक्षिस वितरण कार्यक्रमात प्रमुख वक्ता म्हणून त्या बोलत होत्या. वंदे मातरम राष्ट्रीय गीता बद्दल माहिती देऊन पंडित जवाहरलाल नेहरू, भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर त्यांनी माहिती देऊन देशकार्य हे कोणत्याही माध्यमातून करता येते फक्त त्याला कर्तुत्ववाची जोड अत्यावश्यक असल्याचे त्यांनी कार्यक्रमात म्हटले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रविंद्र पहानपटे यांनी भगवान बिरसा मुंडा यांचे जीवनकार्यावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले. यावेळी भगवान बिरसा मुंडा यांना सर्वांनी अभिवादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच रविंद्र पहानपटे शिवणी चोर हे होते. विशेष अतिथी रविंद्र चौधरी अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती हे होते. यावेळी प्रमुख उपस्थिती योगिता वनकर, शंकर लोनगाडगे, सरस्वती कोडापे, विलास लोनगाडगे, विद्या पहानपटे, केशव ढोके, चंदा मडावी यांची लाभली. प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रकाश चुनारकर यांनी केले. सूत्रसंचालन वर्षा वैद्य यांनी केले तर उपस्थितांचे आभार अमोल देठे यांनी मानले. यावेळी शालेय स्तरावर आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा बक्षिस वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. वैदवी वनकर हिला प्रथम क्रमांकाचे बक्षीस देतांना रविंद्र पहानपटे, रविंद्र चौधरी, नंदिनी चुनारकर व इतर मान्यवर उपस्थित होते.



## भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती साजरी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१५, अंबाजोगाई (बीड) :** आदिवासी लढ्याचे अग्रणी, भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त शहरात आयोजित कार्यक्रमास केज विधानसभा मतदारसंघाच्या कार्यसम्राट आमदार नमिता अक्षय मुंदडा यांची उपस्थित होती. या कार्यक्रमाच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा यांना १५० व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करून त्यांच्या विचारांना उजाळा देण्यात आला. आदिवासी समाजातील नागरिक, विद्यार्थी, महिला बचतगट, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले. याप्रसंगी बिपिनदादा शिरसागर, राजाभाऊ वामनराव ठाकूर, प्रा.हनुमंत साळुंखे, तानाजी देशमुख, विशाल केंद्रे आदि मान्यवर उपस्थित होते.



## युवकाची गळफास लावून आत्महत्या

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१६, बुलडाणा :** बुलडाणा येथील क्रीडा संकुल मार्गावर आदर्श कॉलनीमध्ये स्थित एका २५ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना रविवार, दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी समोर आली आहे. अक्षय अशोक देशमुख असे मृतक तरुणाचे नाव असून तो आई आणि आजोबासह राहत होता. वडील कोरोना काळात मरण पावलेले असल्याचे कळते. छताला लटकून अक्षयने जीवन संपविले. या घटनेमुळे देशमुख कुटुंबावर हे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.